# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'.MeloRoad,Fort, Mumbai-400 001 E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360 website: www.msbnpe.org


---

मराशुपशिमं/सूचना / ३८३८ /२०२५ दिनांक:१० /११/२०२५

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित परिचर्या प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य-

विषय: सर्व महिला विद्यार्थीनी व अध्यापक यांना "स्त्रीशक्ती" या महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नीत ए.एन.एम व जी.एन.एम व इतर पदवीका अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय/संस्थ्येच्या प्राचार्य/संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने महिलांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी "स्त्रीशक्ती" (Stri Shakti) हा अधिकृत डिजिटल प्लॅटफॉर्म सुरु केला आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे राज्यातील सर्व महिला विद्यार्थीनी, अध्यापक व महिला उद्योजक यांना स्वतःची वैयक्तिक व व्यावसायिक ओळख निर्माण करण्याची, शासकीय योजना, स्वयंसेवी संस्था (NGOs), स्वयं-सहायता गट (SHGs), उद्योजक व मार्गदर्शक यांच्याशी संपर्क साधण्याची तसेच आपली कल्पना, नवसंकल्पना, उत्पादने व सेवा नि: शुल्क प्रदर्शित करण्याची संधी मिळते.

या उपक्रमाचा उद्देश महिलांना डिजिटल माध्यमातून सक्षम करणे व त्यांच्या सामाजिक-व्यावसायिक प्रगतीसाठी एक एकत्रित मंच उपलब्ध करून देणे हा आहे. तसेच या प्लॅटफॉर्मवरील सहभागाद्वारे महाविद्यालयांना NAAC च्या सामाजिक पोहोच, विद्यार्थी सहभाग व उद्योजकता प्रोत्साहनाशी संबंधित निकषांची पूर्तता करण्यासही सहाय्य होईल.

त्या अनुषंगाने, आपणास कळविण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील सर्व महिला विद्यार्थीनी व महिला अध्यापकवर्ग यांनी "स्त्रीशक्ती" पोर्टलवर त्वरित नोंदणी करावी, यासाठी आवश्यक त्या सूचना द्याव्यात. नोंदणी प्रक्रियेसंबंधी मार्गदर्शन व अधिक माहिती https://strishakti.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या उपक्रमात आपल्या महाविद्यालयाचा सक्रीय सहभाग महाराष्ट्र शासनाच्या "महिला सक्षमीकरण" या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी महत्वाचा ठरेल.

प्रबधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत: माहितीस्तव सविनय सादर
१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नविन मंत्रालय,गो.ते.रू.संकुल, मुंबई.
२) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण तथा आयुष विभाग, मुंबई
३) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई